१९

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १३२/प्रनिप्रा/१२६५ दिनांक : 01 JUN 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, **दिनांक १३ मे, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ६० व्या बैठकीचे इतिवृत्त,-

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ६) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई तथा परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व २) डॉ. बी. एन. हिवाळे, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. एस.जी. गिरबिडे, परिक्षा समन्वयक, आयुष / वैद्यकीय शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व ४) डॉ. (श्रीमती) रेश्मा देसाई, विशेष कार्य अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १३/०५/२०२२ | दुपारी १२:०० वा. | वैद्यकीय शिक्षण | बी.पी.टी.एच. |
| | | दुपारी ०३:०० वा. | | बी.एस्सी. नर्सिंग. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक बैठक-१८२२/प्र.क्र.१०३/प्रनिप्रा/४६५, दिनांक १७/२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरणाची ६० क्रमांकाची बैठक शुक्रवार दिनांक १३ मे २०२२ रोजी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक बी.पी.टी.एच. व बी.एस्सी. नर्सिंग. या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयोजित करण्यात आलेली आहे.

या संदर्भात संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक संवैशिवसं/ शै.व. २०२१-२२/पदवी-पदव्युत्तर पडताळणी/२०२२, दिनांक ०९/०५/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक बी.पी.टी.एच. व बी.एस्सी. नर्सिंग. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयोजित केलेली क्रमांक ६०वी बैठक दिनांक १७/०६/२०२२ रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापि संचालनालयाचे अहवाल प्राप्त नसल्याने या अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत महाविद्यालय निहाय आढावा घेण्यात आला.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक बी.पी.टी.एच. व बी.एस्सी. नर्सिंग. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता संबंधीत विद्यार्थ्यांनी प्रवेशावेळी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या पोर्टलवर सादर केलेल्या प्रमाणपत्र/कागदपत्रांची निवडक पध्दतीने छाननी/तपासणी करण्यात आली व दरम्यान काही प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश घेते वेळी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांमध्ये संधिग्दता दिसून आली, तद्नंतर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले,-

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदवी नर्सिंग व भौतिकोपचार अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense व ४) Orphan या संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला आहे. या अनुषंगाने प्राधिकरण कार्यालयाने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या दिनांक १७/०६/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

संबंधित महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश मान्यता प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर तसेच प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी व उक्त नमूद केल्यानुसार प्रमाणपत्रांची तपासणी/छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदवी नर्सिंग व भौतिकोपचार अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत निर्णय घेण्यात येईल.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) विश्वनिकेतन कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आर्टस ॲण्ड डिझाईन, जिल्हा - रायगड येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित कु. मंगेश राजन डेरवनकर यांच्या प्रवेश प्रकरणी.

विश्वनिकेतन कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आर्टस ॲण्ड डिझाईन, जिल्हा - रायगड येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित कु. मंगेश राजन डेरवनकर या विद्यार्थ्याचा प्रवेश हा संस्था स्तरावर झालेला होता व सदरील विद्यार्थ्याची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेशामध्ये जात वैधतेची त्रुटी दर्शविण्यात आली असल्याने सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता विहित कालावधीमध्ये झालेली नाही. या अनुषंगाने संबंधीत महाविद्यालयाने दिनांक १०/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कु. डेरवनकर यांच्या प्रवेशास खुल्या संवर्गातून मान्यता मिळण्याची विनंती केलेली आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

या संदर्भात दिनांक ११/११/२०२० रोजी सुनावणी झालेली असून पुनर्विलोकन याचिका प्राधिकरणाच्या दिनांक २२/१०/२०२१ रोजीच्या सुनावणी आदेशाद्वारे फेटाळयात आला असल्याने सदरील प्रवेशास ना मंजूर करण्यात आलेले आहे. प्राधिकरणाच्या सदरील आदेशाच्या विरोधात कु. डेरवनकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, मुंर्ब येथे याचिका क्रमांक ३६०२/२०२२ दाखल केलेली आहे. सदरील याचिके प्रकरणी मा. न्यायालयाने दिनांक २६/०४/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशान्वये प्रस्तूत प्रकरणी १५ दिवसांत निर्णय घेण्याचे आदेश पारीत केलेले आहेत, तद्नुषंगाने या संदर्भात दिनांक १३/०५/२०२२ रोजी संबंधीत विद्यार्थी व महाविद्यालयास सुनावणी देण्यात आलेली आहे.

सुनावणी दरम्यान संबंधीत विद्यार्थी व महाविद्यालय यांनी कु. मंगेश राजन डेरवनकर यांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने सहाय्य होत असलेली आवश्यक माहिती तसेच या संदर्भात विद्यापीठाशी केलेल्या पत्रव्यवहारा बाबतची कागदपत्रे प्राधिकरणास ०७ दिवसांत सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे. वरील प्रमाणे माहिती प्राप्त झाल्यानंतर सदरील प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्याबाबत प्राधिकरण कार्यालयाने कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 1/6/22